मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०१९

पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक जिल्ह्यातून वितरीत होणारे

Posted at Pune City H. O., Pune Daily

दैनिक

PCW/ 012/ 2018-2020

राष्ट्रतेज

ज्ञानम् परम् ध्येयम्

# १७ वर्षाखालील राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी 'सूर्यदत्ता'च्या यशराज दळवीची निवड

## सूर्यदत्ता ज्युनिअर कॉलेजच्या यशराज दळवीला राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत कांस्यपदक



पुणे/प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्या वतीने लातूर जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या १७ वर्षाखालील राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत मुलांच्या गटात सूर्यदत्ता ज्युनियर कॉलेजच्या यशराज दळवीने कांस्यपदक मिळवत यश प्राप्त केले. राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळवल्यानंतर यशराज दळवी आता राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

येत्या २८ नोव्हेंबरपासून हरियाणातील कर्नाल येथे राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धा होणार आहेत. यशराजने मिळवलेल्या यशाबद्दल सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि उपाध्यक्ष सुषमा चोरडिया, फिटनेस अँड स्पोर्ट डायरेक्टर निशिगंधा पाटील यांनी अभिनंदन केले.

याप्रसंगी बोलताना डॉ. संजय चोरडिया म्हणाले, यशराज राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार असल्याने सूर्यदत्ता परिवाराची मान अभिमानाने उंचावली आहे. संस्थेतील विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. या सगळ्या खेळाडूना प्रोत्साहित करण्यासाठी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. खेळामुळे मानसिक व शारीरिक आरोग्य उत्तम राहते.